
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. २७८४

# निर्मितीचा प्रदेश

प्रकाश खरात



REFBK-0023885
REFBK-0023885

सं६३ आव -

## मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ [८] नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

( क्र. मा. प. )
५०००–१२–८२

या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी
महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचे अनुदान मिळाले आहे.

प्रथम आवृत्ती — मार्च १९८३

© विजया खरात

मुखपृष्ठ : अरुण कालवणकर

मांडणी व रेखाटने : सतीश खानविलकर

मुद्रण : 'विविध' २८, लक्ष्मी बिल्डिंग,
चमारबाग क्रॉस लेन, परळ,
मुंबई ४०० ०१२.

प्रकाशन : भीमस्मृती प्रकाशन
विजया खरात
१६/४९, न्यू बी. डी. डी. चाळ,
म. फुले रोड, नायगांव, दादर,
मुंबई ४०० ०१४.

मूल्य : १० रूपये

संदर्भ काव्य
२४७४
२३८८५
२५६८३

दैन्यदुःखाशी अविरत झुंजून मला रेहनीला लावणारी
आई लक्ष्मीबाई
व
आंबेडकरी चळवळीतील थोर समाजसेवक
टी. एस्. धोत्रे गुरूजी
यांच्या प्रेरक स्मृतींस

पूर्वप्रसिद्धी : आयुध, पूर्वा, निकाय, लोकवाङ्मय, लोकमत, सत्यकथा इ.

# निर्मितीच्या प्रदेशात स्वतःला हरवून जाताना

कवी प्रकाश खरात आपला पहिला काव्यसंग्रह 'निर्मितीचा प्रदेश' घेऊन मराठी कवितेच्या प्रांगणात आपलं पहिलं वहिलं साहित्यिक पाऊल टाकीत आहे. प्रकाश खरातच्या या 'निर्मितीच्या प्रदेशात' गेले कित्येक दिवस नि रात्र मी सारखा वावरतोय. हिंडतोय. शोधतोय. पहातोय. ऐकतोय. डोळे मिटून घेतोय. डोळे उघडतोय. प्रकाशला आणि त्याचा गुणी धाकटा भाऊ शंकरला मी त्यांच्या विद्यार्थीदशेपासून ओळखतोय. हे दोघेही बंधू माझे विद्यार्थी होते; तेव्हापासून मी त्यांची समग्र वाटचाल सहसंवेदनेने न्याहाळतोय. या दोघाही बंधूंना काव्यनिर्मितीची अभिजात देणगी लाभलेली आहे. विद्यार्थीदशेत प्रकाश जेवढा प्रकाशात नव्हता; तेवढा आता तो प्रकाशात आलाय. १९७६–७७ पासून त्याच्या कविता मोजक्याच पण लक्षवेधी अशा मान्यवर मराठी मासिकातून व दिवाळी अंकातून प्रसिद्ध होताहेत. १९८० सालापर्यंत प्रसिद्ध झालेल्या प्रकाशच्या कवितांचा हा बहुगुणी संग्रह म्हणजेच त्याचा 'निर्मितीचा प्रदेश' आहे. हा प्रदेश अंधारभरला आहे; तसाच प्रकाशमयही आहे.

प्रकाश खरात याची या संग्रहातील एकूण एक कविता त्याची अशी खास, आत्ममग्न व आत्मलीन कविता आहे. कोणत्या एका प्रचलित कविता संप्रदायात ती सहजासहजी जाऊन बसते; असेही म्हणता येणार नाही. दलित साहित्याच्या चालू साहित्य प्रवाहाच्या खूप जवळ जाऊनही ती केवळ दलित साहित्याची प्रकृती, आकृती

वा विकार घेऊन प्रकट होणारी दलितांतर्गत बहुमुखी कविता आहे, असेही वाटत नाही. ही सगळीच कविता कमालीची अंतर्मुख व आंतरसंवेद्य कविता आहे. ती भाव आणि अभाव अशा दुहेरी पातळीवर अभिव्यक्त होत जाणारी आत्मगत आणि आत्मतत्पर कविता आहे. आत्मपरावर्तित व आत्मस्थित रसिक मनाला प्रकाश खरात याचा हा ' निर्मितीचा प्रदेश ' आपल्यातलाच खूप आतला व आपलाच आहे, असे उत्कटतेने वाटण्याइतकी ही घनदाट कविता आहे. या प्रदेशात फिरताना मी स्वतः आतून खूप अस्वस्थ झालो आहे. उध्वस्तही होत आहे. एक तीक्ष्ण व सूक्ष्म अशी गडद गहिरी दुःखसंवेदनासारखा माझा छळ मांडीत आहे. कवी शेलेसारखा हा कवी पुन्हा पुन्हा जीवनमरणाच्या काट्यांवर पडत आहे; व हे काटे कवीला रक्तबंबाळ करीत आहेत, अशी अनुभूती या ' निर्मितीच्या प्रदेशा'त सारखी माझ्या वाट्याला येत आहे. ही कविता रसिक मनाला झपाटूनही टाकते आणि तितकीच ती रसिक मनाला आटवूनही टाकते. कोरडी करीत रहाते. पाण्याने तुडुंब भरलेली विहीर एकाएकी आटून आणि फाटून जावी; पाण्याच्या टिपूसभर थेंबाचाही त्या विहीरीच्या तळाशी मागमूस राहू नये, अशी अवस्था रसिक मनाची या निर्मितीच्या प्रदेशात कधी कधी अनावर जीवघेणेपणानं होत रहाते. आणि तरीही काही अल्पावधीतच हा कोरडेपणा संपूर्ण नाहीसा होत हा प्रकाश खरात याचा निर्मितीचा प्रदेश पुन्हा ओले अंग धारण करीत आर्द्र चिंब होत रहातो. ही ओल आणि हा कोरडेपणा जणू हातात हात घालून या निर्मितीच्या प्रदेशात वावरताना दिसतात. परस्परपूरक होत रहातात. अर्थातच प्रकाश खरात याची ही कविता दलितांतर्गत थेट बहिर्मुख व बहुमुखी कविता नसली तरी या कवितेतील वर्तमान-

कालिन दलित जीवनाचे दारूण वास्तव व वस्तुगत संदर्भ प्रकर्षाने दलित साहित्याचेच असल्याचे जाणवल्याखेरीज रहात नाहीत. किंबहुना वाचकाच्या जाणीवेवर ते सतत आघात प्रत्याघात करीतच रहातात. दलित साहित्याच्या प्रवाहाला ते पुष्ट व उन्नत करतात. एक नवी कलासुंदर अर्थगर्भता देतात. एक नवा आकार, नवे रूप, नवा आशय व अनोखी कालसूक्ष्मता देतात. जीवनमृत्यूचा, प्रकाश अंधाराचा, होकाराचा आणि नकाराचा बहुपेडी गोफ गुंफितात.

या निर्मितीच्या प्रदेशात कवी 'मी', 'तू', 'आम्ही' या आत्मनिष्ठतेच्या व वस्तुनिष्ठतेच्या परिघात एका भावोत्कट आत्म-जाणीवेने निरंतर आविष्कृत होत रहातो. प्रारंभापासूनच कवीच्या अंतर्यामातील अथांग व अमूर्त भावजाणिवांचं नातंगोतं शहराशी जडलेलं असतं आणि या शहराला समुद्राने वेष्टिलेलं असतं. त्यामुळे कवीच्या अंतर्मनातील भावजाणिवा सहजच शहरातून किंवा शहरावाटे समुद्रात किंवा समुद्राकडे परावर्तित होत जातात. समुद्राचं आणि शहराचं एक अतूट नातंगोतं कवीच्या भावजीवनाशी गडद गहिरे-पणाने जुळत आणि जळत जातं. या संपूर्ण 'निर्मितीच्या प्रदेशा'वर एक जीवघेण्या 'मृत्यूचा सर्वंकष काळोख' पसरलेला असतो. त्या काळोखात कवी शोकात्म सूर आळवीत रहातो. 'सूर्य मळभला तरी', 'नियतीचा काळोख प्राशून', 'शक्यतांचे अनेकविध दिवे' पेटण्याची वाट पहात निश्चितपणे स्थिरावत रहातो. आणि तरीही या कवीचं त्याच्या मृत्यूगामी कवितांतून परावर्तित होणारं भावविश्व बाह्य मानवी जीवनवास्तवाला होकारात्म होत थेट जाऊन भिडलेलं असतं. म्हणूनच इवल्याशिवल्या चपखल आकृतीबंधातील आवळघट्ट अशी पीळदार वीण असलेल्या प्रकाश खरात नावाच्या कवीच्या या कविता प्रतिमांचे

नानाविध तरंग सौंदर्यशीलतेने साकारत व्यक्त होत रहातात. कवी वस्तूत: स्पंदनक्षम भावविश्वातील सूक्ष्मतरल अशा आंतरिक अमूर्त जाणीवेतून काहीसा विव्हळत, उसासत, हूरहूरत व हळूवारपणे उचंबळत निर्मिती-क्षम समूर्ततेकडे झेपावत रहातो. गडदगब्राळ्या मृत्यूजाणीवेने व मृत्यूच्या प्रत्यक्ष अनुभूतीने समूर्त झालेले दु:खवेदनांचे तीक्ष्ण तीव्र सूर, रौद्रभीषण अशा कुणा अनादिआदिम संगीताच्या चिरंतन लयीत व तालात कवी सघन गहनतेने उमटवीत रहातो. ती समुद्रखोल गडद गहन सुरावट या कवितेच्या रसिक वाचकाच्याहीं अंत:करणात अनंत काळोखांचे अर्थगर्भ कंप भूकंपासारखे, भावानुभूतींचे थरावर थर रचीत, अविरत थरथरू लागते. मला तर या कवितांचे पुन्हा पुन्हा माझे आंतरिक भावविश्व गदमरवून व कोलमडून टाकणारे, वाचन करताना, स्पॅनिश महाकवी पॅब्लो नेरुदा याच्या दैणिक मृत्यूगीतातील अव्यक्त आदिम संगीताची व्यक्त भावलय सतत आठवत राहिली. एवढी हीं गडद गहिरी अनादी अनंत अशी मानवी दु:खाची चिर अनुभूती कवीच्या आजवरच्या छोट्याशा ऐहिक जीवनात, अमाप व अगाध-पणे त्याच्या वाट्याला कशी काय आली, याचेहीं मला आश्चर्य वाटत राहिले. हा कवीचा 'निर्मितीचा प्रदेश' वरवर वाटतो तितका साधा, सोपा, सरळ व सुबोध नाही, हेहीं मला जाणवले. या कवीच्या आंत-रिक भावविश्वातील दु:खवेदनांनी ठसठसणारी व थरथरणारी आत्मरत व आत्मगत जीवनानुभूती माझ्या भावजाणीवेत रूजत आणि रुतत राहिली. शहराला आणि समुद्राला साद घालणारा हा कवी, शहराला आणि समुद्राला अंतर्बाह्य व्यापूनहीं, शतांगुळे उरलेला आहे, याचीहीं प्रचीती मला, त्याच्या प्रत्येक कवितेच्या ओळीओळीतून येत गेली. हीं अत्युत्कट आत्मजाणीवेची संपूर्ण कविता आत्मगत, आत्मरत

व आत्मस्थित होत असतानाच, जीवनाभिमुख व मानवाभिमुख होत रहातानाहीं मला दिसते. तेव्हा तर ती मला खूप आशादायकही वाटू लागते. तिचे भान जसे व्यक्तिगत आहे, तसेच ते समष्टीगत आहे, याचा प्रत्यय येऊ लागतो. अंतर्गर्भ दुःखवेदनेचा छडा कवी बाह्य मानवी विश्वात व या विश्वात वस्तीला आलेल्या समाजव्यवस्थेत शोधतो, तेव्हा केवळ निराशेच्या व नकाराच्या तमोव्यूहात ही कविता व ती लिहिणारा कवी फसला व फासला जाणार नाहीं; याची मला निश्चिती वाटू लागते. 'कित्येक अंधारगुहा ओलांडून' कृष्णमूर्ती नावाच्या कुणा आधुनिक प्रेषिताने निर्देशिलेला मुक्त प्रकाश पाह्यला (त्यानेच सांगितलेले समूह मरण पत्करुन) आम्हीं येऊसुद्धा असा दिलासा देखील हा कवी देत रहातो. तेव्हा खरोखरच तो प्रकाशाच्या वाटेवरून खंबीरपणे पाऊल टाकीत असलेला दिसू लागतो.

कवी 'निर्मिती प्रदेशा'त प्रत्यक्ष पाऊल टाकताना,

> तू स्वीकार
> पुढील दलदल
> निर्मितीचा प्रदेश म्हणून

अशी स्वतःच स्वतःला एका अभद्र वास्तवाची जाणीव करून देतो. आणि तरीहीं 'लगतचे पडिक स्मशान / प्रेतांची दुर्गंधी' ओलांडून जाताना 'तू जपून ठेव तुझी हळवी फुले' अशी भावतरल हळूवार संवेदनशीलताही तो प्रकट करतो.

प्रकाश खरात याची ही मोजकीच पण मौलिक कविता माझ्या-सारख्या रसिक वाचकाला एका भव्यभीषण आणि तरीही तत्त्वखोल आणि वस्तूखोल होत जाणाऱ्या भावावर्तात गुरफटत व गरगरत ठेवते.

ही संपूर्ण कविता समुद्रशिंपल्यात स्वातिनक्षत्राचे जलबिंदू पडल्यावर अंतर्सृजन होऊ लागलेल्या मौक्तिकद्रवाप्रमाणे अनुकंप पावते. रमणीय अद्‍भुततेने थरथरते. रसिकाची भावावस्था दुभंगून व तिभंगून टाकते. ही विचक्षण अशी आंतरिक आत्मजाणीवेची अतिसूक्ष्म कविता आतील 'मी 'ला निर्भयपणे सामोरी जाते. कधी ती पक्षीपंखाइतकी तरल व हळूवार होते; पण ती हळवी व पळपुटी होत नाही. कवी केशवसुतां-प्रमाणेच या कवितेने मानवी दुःखाचा प्याला सॉक्रेटिक स्थितप्रज्ञतेने पण डोळे सताड उघडे ठेवून प्यालेला आहे. म्हणूनच कवी तिची वीण व गुंफण शिल्पकाराने कणखर अशा काळीथर पाषाणखंडावर कोरलेल्या शिल्पाकृतीसदृश आकृतीबंधातून ठाम भक्कमपणाने करीत रहातो. प्रकाश खरात यानेच आपल्या एका कवितेतून उपयोजिलेल्या शब्दाप्रमाणे ही त्याची कविता 'पॉझिटीव्ह' आहे. 'निगेशन'च्या झंजावातात व समुद्रवादळात ती सापडलेली असूनही अंतर्यामी व अंततः ती 'निगेशन'चे 'निगेशन' करण्यातच सफलता पावते. चक्रीवादळाच्या सर्वसंहारक झंझावाती हातांचे स्वागत करणारी व मृत्यूची गाज ऐकविणारी ही क्रांतिगामी व युगसमक्ष सूर्यसाक्षी कविता आहे. प्रकाश खरात याच्या निर्मितीच्या प्रदेशात समुद्रप्रतिमा सूर्य-प्रतिमांच्या बरोबरीने हातात हात व गळ्यात गळा घालून वाटचाल करताना आपल्याला भेटतात. कवीला आभाळाचे व आभाळ प्रतिमांचेही वावडे नाही.

विद्यापिठीय आत्ममग्न कॅम्पसमधून

तेव्हा

वास्तविकाच्या दबावातून

बुटक्या होत गेलेल्या लोकांनी

माझा आभाळचेहरा ओळखलाच नाही

असे कालविधान जेव्हा प्रकाश खरात याची कविता रोखून व निक्षून करते, तेव्हा 'स्यूडो' किंवा 'बनावट' विद्यापिठीय 'तथागतां'चे व 'तथाभागां'चे प्रस्थापित मुखवटे ती टराटरा फाडते.

प्रकाशची कविता एका समाजास्थित 'मी' मध्येच, खोल खोल अशा बिनतळाचा तळ गाठीत जाणारी आत्मनिष्ठ कविता आहे हे खरेच. पण हीं आत्मनिष्ठता किंचितही आत्मसंकुचित होत नाहीं. उलट आत्मसंकोच करणारी आत्मकेंद्रित आवरणे ती कटाक्षाने दूर झुगारून देते. ती जाँ पॉल सार्त्र सांगतो 'त्या दुसऱ्या' (The Other) कडेहीं स्वाधिष्ठित 'मी'तून सहजगत्या व अतीव प्रगल्भतेने परावर्तित होते. तिचा 'अनुभवसिद्ध कणखरपणा' कुठेहीं कोता किंवा कमकुवत होऊ देण्याचे ती साफ नाकारते. म्हणूनच प्रकाश खरात याची या त्याच्या 'निर्मितीच्या प्रदेशा'तील प्रत्येक छोटी मोठी कविता हेच मुळी एक वर्तमानकालांतर्गत युगसत्य साकार करणारे एक एक मानवी युगविधान होत रहाते. त्यातून बाहेर उमटणारी लकेर मानवी वास्तवाच्या चिरंतनत्वाला जाऊन भीडणारी असते. ही लकेर आक्रस्ताळी किंवा कर्णकर्कश नसते. ती कमालीची अर्थसूक्ष्म व संवेदनातरल असते. एक सघन व समग्र अशी युगवस्तू अंतरात रिचवित पचवित प्रकाश खरात याची कविता आपला आंतरिक ताल, लय व सूर साधते.

प्रकाश खरात याची प्रत्येक कविता रसिक वाचकाच्या आंतर जाणीवेत एक 'ऑ' (awe), एक विचित्रपण निर्माण करते. या

विचित्रपणातून स्वतःला स्वतः सावरत रसिकाला कोणत्या तरी एका आत्मगत दारूण वास्तवाचे पुराण थर, थरातून थरात जात, उलगडता आले की, प्रकाश खरात याच्या कवितेचे अंधःकाराच्या अवगुंठणातून प्रकाशमय होत जाणारे सचित्रपण सहजगत्या दिसू लागते. प्रकाश खरात याची कविता म्हणूनच समकालीन नव्या तरूण पिढीच्या नव्या मानवजागृत, दलितजागृत, क्रांतिजागृत व युगजागृत कविता-प्रवाहाला आपला असा नवा छेद देते. प्रवाहात असूनहीं ती प्रवाह-पतित होत नाही. प्रवाहाबरोरच जाता जाता ती प्रवाहाला अधिक दूर घेऊन जाते. प्रवाहाला दिशाहीन होऊ देण्याचे नाकारते. कारण या 'निर्मितीच्या प्रदेशा'त स्वतः कवीनेच म्हटल्याप्रमाणे 'कलावंताच्या वेदनेसारखे' व्याकूळ करणारे विस्तारलेले ढगही 'गावकूस' उजविल्या-खेरीज रहाणार नाहीत. कित्येक अंधाराच्या गुहा ओलांडून 'गतिमान सूर्याच्या प्रखरते'कडे जाणारी 'ज्वालामुखी आंच' प्रकाश खरात याच्या कवितेला आक्रंदून लागलेली आहे. ही कविता आपले क्रांति-गर्भ युगभान काबूत आणि शाबूत ठेवते. आपले अंधाराचे हात सूर्यतेजाने सजग करते. सूर्याला दंशणाऱ्या सर्पामध्ये त्या हातांचे रूपांतर करते. अंधाराचे हात 'कलुषी' म्हणून कलम करावेसे तिला वाटतात. प्रकाश खरात याच्या या 'निर्मितीच्या प्रदेशा'त एक 'नंगा फकीर' आपल्या 'अस्तित्वाची वस्त्रं' उतरवून 'जीवन-मरणाच्या सीमारेषेवर' जगताना जसा भेटतो; तशीच काळाचा संदर्भ विसरून कुणी एक याचक तिच्या दारी तिष्ठत आहे, अशी एक 'जोगीण' ही आपल्याला आवर्जून भेटते. ती 'जोगीण' त्या याचकाच्या झोळीत ओंजळभर मरण टाकते. तर तो 'नंगा फकीर' जिवाच्या आकांतानं ओरडतोय. चूड लावीन म्हणतोय अंधार-झावळ्यांना......

प्रकाश खरात याची ही त्याच्या प्रारंभकाळातील पहिली-वहिली कविता ही अशी अर्थगर्भ व प्रगल्भतेची उंची व खोली गाठणारी समर्थ कविता आहे. ती कविता आव्हान देते; व अस्वस्थ करते. अंधाराच्या गुहेत आपल्याला घेऊन जाते; आणि तरीही प्रकाशाचा झोत आपल्यावर रोखून धरते. ती उगीचच अधीर व उतावीळ होणारी उथळ व वाचाळ कविता नाहीय. ती नेमकी व निश्चित दिशा धुंडाळणारी जीवनानुगामी भावकविता आहे. वाद, संवाद व विसंवाद यांचे तिचे भान पक्के आहे; व तिची कलानिर्मितीची काव्यात्म जाण सच्ची आहे. खोट्या कवितेच्या मोहजालापासून ती अनंत योजने दूर आहे. तिची अध्यात्मिकता आधिभौतिकतेत विसर्जन पावते. अमूर्ततेचे ध्यान धारण करणारी ही तरल गडद कविता समूर्ततेकडे झेपावत जाणारी विश्ववास्तवी कविता आहे. दलितांचे युगायुगाचे नतद्रष्ट नष्ट करू पहाणाऱ्या महामानवाचे तिला स्मरण आहे. मरणाचे गीत गाणारी केवळ ती तथाकथित सरणाची कविता नाही आहे. मरणातून अमर जीवन साकार करणारी ती द्रष्टी व स्रष्टी युगकविता आहे.

प्रकाश खरात याच्या कवितेचे भवितव्य उज्ज्वल आहे. ती भूत, वर्तमान व भविष्य यांचे गीत गाणारी व त्यांचे दिशासूचन करणारी युगकेंद्रित कविता आहे. ती युगउत्स्फूर्त व आत्मविभोर अशा एका अभिजात कवीच्या उद्याच्या युगगामी काव्यनिर्मितीच्या विशाल प्रदेशाचे, दुरूनच दर्शन देणारी खरीखुरी आजची कविता आहे.

१३ / फुलराणी, साहित्य सहवास,
वांद्रे (पूर्व), मुंबई–४०० ०५१.

प्र. श्री. नेरुरकर

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
वा. क्र.
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

## शहर


हे शहरा !
तू समुद्रासारखा विशाल असल्याची कीर्ती ऐकली तेव्हा
मी सूर्यपक्षासारखा तुझ्या प्राचीच्या दिशेनं झेपावलो.
उरी सूर्यास्ताचं दु:ख होतं.
अंधारयुगाचं प्रतिक असलेलं काळोखी गाव,
शत्रू नजरेआड व्हावा; तसं दूर मागं पडलं होतं.
येताना मात्र तिथल्या मरणाच्या स्मृती
मी नदीत विसर्जित केल्या होत्या.
तुझ्या सर्वसमावेशक कुशीत विसावताना
मला मरणकळा विसरायच्या होत्या.
ते गावकुसाबाहेरील माझं बेवारशी घर
त्यातील पूर्वजांचा न विरलेला असह्य आक्रोश
दैन्यदु:खाचे विखारी डंख
माझ्या स्वप्नसृष्टीचं झालेलं स्मशान
सारं काही मला विसरायचं होतं.
माझं हरवलेलं मनुष्यत्व तुझ्याकडून मिळवायचं होतं.
तुझ्या विशाल गर्भातून पुनर्जन्म घ्यायचा होता.

मग सांग ! हे महान मित्रा !
का तुझ्याच रस्त्यांनी माझ्याशी फितूरी केलीय ?
नि मला दिवसाउजेडी नागवलंय ?
तुझ्या निःपक्ष यंत्रालयातून
अमानुषता का मला कैदाशिणीसारखी छळतेय ?
ही पदोपदी भेटणारी माणसं
का माझ्या चेहऱ्याकडे संशयानं पहातायृत ?
हे महाकाय शहरा !
तुझ्या भूमीत विषवल्ली वाढतेय
याची तुला जाणीव आहे का ?
तुझ्यात वाढणारे हे माणसांचे निवडुंग
त्यांनी मला रक्तबंबाळ केलंय रे.
हे माझ्या प्रिय दोस्ता !
तू माझे युगाचे अश्रू पुसणारच नाहीस का ?
तुझ्यातील अंतस्थ अराजक पाहून
तू निर्णायक क्षणी दुःखितांच्या वतीनं लढतोस ना ?
तुझा लढ्याचा इतिहास मी विसरलो नाहीय.
तू माझ्या न्यायी छावणीत ये !
बघ,
माझे पाय तुझ्या शस्त्रागाराकडं वळलेयृत.

# तू दैन्यदु:खाच्या साम्राज्याला शह दे

दैन्यदु:खाच्या साम्राज्यात
मृत्यूचे दूत अदय पावलांनी संचार करीत होते.
मृत्यूचे दूत जीवनाची लयलूट करीत होते.
रस्त्यारस्त्यांवरचे नित्याचे मरण पाहून
माझे डोळे थिजले होते.
मी पुन्हा पुन्हा दु:खाची कात टाकून सतेज होत होतो.
मरणाचा वेध घेत दु:खसंतापानं सळसळत होतो.
उद्वेगाचे फुत्कार सोडीत होतो.
माझ्या मानेवरचे मृत्यूचे पाश आवळत होते.
निराशेच्या ग्लानीत मी निपचित पडून होतो.

मध्यरात्री कधीतरी तिच्या सजग हातांनी जाग येते.
तिच्या डोळ्यात स्वप्नांचे तेज असते.
ती प्रेयसीच्या अधीरतेनं म्हणते;
'चल, ही दैन्यदु:खाची सीमा ओलांडून.
पलिकडे स्वप्नांच्या प्रदेशात तुझ्यासाठी मी घरकूल उभारते.
आजूबाजूला नंदनवन फुलवते.'
मी तिला हर्षभरानं आलिंगन देत म्हणतो आग्रहानं;
'तू रहा माझ्या चंद्रमौळी झोपडीत
तुझ्या सहवासात माझ्यातील काळोखाचा अंश वितळू दे !
तू मरणग्रस्तांना आश्वासक हातांनी अभय दे !
तू पेटव त्यांच्या प्राणज्योती प्रकाशकिरणांच्या हातांनी
तू दैन्यदु:खाच्या साम्राज्याला शह दे !






**आक्रमक पवित्र्यातला तो मी कुठाय ?**

तो काळ तसा दु:खसंतापाचा होता.
तेव्हा दिशाहीन होऊन तो अस्तित्व शोधित होता.

त्याचा परिचय होता दु:खवाटांशी....
बुद्धाच्या नजरेनं तो दु:खाचा वेध घेत होता.
अंधारयुगाकडं वळून पहाताना
सिंहासारखा क्रुद्ध होत होता....
वाटचालीतील चहूबाजूंचे मरण पाहून शिरशिरत होता.
तसा अपार्थिव सूर्याच्या चैतन्यस्पर्शानं थरारत होता.

कधीतरी तो स्थिरस्थावर झाला.
भुकेल्या सिंहाने मांसखंड खावे,
तसा संतुष्ट झाला.
आता नित्याच्या उसाभरीत
दु:खाचे स्मरण करायलाही त्याला वेळ नव्हता.
दु:खवाटांकडे तो फिरकत नव्हता.
आता तो स्वत:लाच चाचपतोय.
गुरगुरत स्वत:लाच विचारतोय.
कुणी आपले दात पाडलेत? कुणी तीक्ष्ण नखे काढलीत?
आक्रमक पवित्र्यातला तो मी कुठाय?




मरण

ही थंड मरणाची प्रक्रिया माझ्यात कुठून सुरू झालीय ?
खरं तर मरणाचं न् माझं नातं तसं नवीन नाहीय्.
जन्मतःच लाभलीय् मला मरणाची आदिम परंपरा.
म्हणून मला हवंय पूर्वींचं चितेवरील जितंजागतं जळणं.
मला हवाय मरणाचा दाहक स्पर्श.
मला हव्यात ज्वलंत मरणयातना.
मला हवंय परत तडफडणं नि दुःखदर्शनानं व्याकूळ होणं.
मला हवाय मरणाच्या वाटचालीतील संघर्ष.
मला हवंय वीरमरण.
मृत्यूचा हा थंडगार अजगर कुठून आलाय ?
मला का विळखा घालून बसलाय् ?

# कुणा अजस्त्र शक्तीच्या टाचांखाली

भर दुपारी माझ्यातील फुले कोमेजताना
रखरखत्या वाळवंटात घडलेला जीवघेणा प्रवास.
कुणा अजस्त्र शक्तीच्या टाचांखाली
दडपलेय्‌त माझे श्वास ?
अंत्यसमयी एकही मित्रत्वाचा चेहरा
नजरेसमोर कसा नाही ?
दिवसांच्या फासावर लटकतोय मी : आंचके देत देत.

२७७४
ग्रं. क्र. २३८८५
कोल्हापूर ५४६३

# प्रेतागार

या प्रेतागारात मी कुठून आलो ?
आणि इथल्या प्रेतांचा चेहरा
माझ्या ओळखीचा
माझ्या नात्याचा.
या प्रेतागारात माझ्या जगण्याच्या प्रेरणा
प्रेतांसारख्या थंड, निर्जीव होतायत.
मी दिसामाजी मरणकळा सोसतोय.
इथे मलाही वेध लागलेत मरणाचे.
मृत्यूच्या भीषण दर्शनानं
माझी जगण्यावरची वासना उडालीय.
सरणावर माझ्या जाणिवा जळून
मनाची चिमूटभर राख उरलीय.
माझ्या स्वप्नांची निर्माल्यवत् फुले
मी प्रत्येक शवावर उधळतोय.
मी दुःखाश्रूंचा समुद्र झालोय.

# वडवानल

वादळवाऱ्यातील तुझ्या उद्दाम लाटा
केव्हाच विरल्यायृत पुळणीवर.
तू तर चाललायृस आत आत : खंगत क्षयरोग्यासारखा.
अटळ आहे ना ही भरती-ओहोटी;
असू दे.
तेवढा हृदयातील वडवानल जपून ठेव.

# तुझ्या निर्वाणाच्या निमित्ताने

चितेवर तुझा पार्थिव देह जळताना
माझ्या अंतरी दु:खसंतापाची चिता जळत होती.
तुझ्या चितेला साक्ष ठेवून
तुला मरणपाश ठरलेले; नि मला जाणवलेले
मृत्यूचे अनेक हात कलम करण्याची
मी प्रतिज्ञा केलीय.
तू होतीस तस्करांनी वेढलेली अगतिक मानवता :
तुझा युगाचा आक्रोश आज माझ्यात निनादतोय.
तुझ्या निर्वाणाच्या निमित्ताने
तुझ्या उध्वस्त जीवनाचा इतिहास
मी हृदयात नोंदून ठेवतोय.
त्या इतिहासाचे उत्खनन करीत
मी लावतोय त्याचा अन्वयार्थ;
ज्यात तुझे अनादि काळाचे हुंदके दडपलेले.

तुझ्या कोकरांसारख्या चुकलेल्या पूर्वजांप्रमाणे
तू अंधःतमातून मरणाकडे
विरूद्ध दिशेनं वाटचाल केलीस;
नि मध्यरात्रीच्या काळ्याशार समुद्रात
काळलाटेबरोबर वाहून गेलीस.
तुझ्या आयुष्यात एकदा तरी
सूर्य उगवला होता का ? सोनेरी वर्ख लेवून ?
तुझ्या जाण्यानं अंधारपर्वाचा दुवा निखळलाय....
तुझी मळलेल्या वाटेवरची
अंधारयात्रा मी थांबवलीय;
नि माझे पाय सूर्यफुलासारखे प्राचीकडे वळलेत.
तू रात्र होवून आली होतीस खरी;
पण अंत्यक्षणी तू गुणी सूर्याला प्रसवलेस.
बघ,
मी पोरकेपणाचे अश्रू पुसलेत.
तुझ्या पश्चात
मी सूर्यतेजानं तळपण्याच्या उर्मीनं क्षितिजावर उगवलोय.

## नंगा फकिर


रस्त्यावरल्या नंग्या फकिरानं
उतरवलीत अस्तित्वाची वस्त्रं;
नि तो जगतोय जीवनमरणाच्या सीमारेषेवर.
तो पितोय काळोखाची सरमाडी दारू.
तो झिंगतोय.
काळोख त्याच्या
नसानसांत
डोळ्यांत
मनांत
भवितव्यात
भिनतोय.
काळोख त्याच्या सर्वांगाला
महारोगासारखा उतून रहातोय.
आता त्याच्या डोळ्यात वेडसर चमक दिसतेय.
विझू विझू घातलेले त्याचे निष्प्रभ डोळे
क्षणात फुलवतायत् अंगार.
तो जिवाच्या आकांतानं ओरडतोय;
'चूड लावीन म्हणतोय अंधारझावळ्यांना.'



# आर्ट गॅलरी

मनस्वी चित्रकारानं सजवलीय अंतर्यामी आर्ट गॅलरी.
त्याच्या हाती संवेदनेचा कुंचला;
नि त्याचे बदलते मूड्स पावसाळी ढगांप्रमाणे.
तो उदासव्याकूळ : रात्री बसून समुद्रकिनारी
रंगवित काळ्याशार लाटा बेभानपणे.

पहाटे त्याचा कुंचला वळलेला पूर्वेकडे : सूर्यफुलासारखा.
तो रेखाटित सूर्योदय एकाग्रतेने.
काळा समुद्र सर्वदूर : नि प्रसन्न सूर्योदय
चित्रकारानं प्रतिभास्पर्शी चित्रे रेखाटलीत;
नि टांगलीत आतल्या आर्ट गॅलरीत.



## जोगीण

तिच्या दारी याचक तिष्ठत होता;
काळाचा संदर्भ विसरून....
म्हणून ती
पडझडलेल्या घरातून
बाहेर आली.
ती होती का कुणी जोगीण ?
तिच्या अस्तित्वभर विखुरलेल्या
नसतेपणाच्या खुणा पाहून
तो माघारी वळणार
तोच
तिने ओंजळभर मरण
त्याच्या झोळीत टाकले.

# अनामिका

इराणी हॉटेल : मी ऐकतोय गाणं तबकडीवरील
मुकेशच्या आर्त स्वरांतील;
'ये आँसू भरी है, ये जीवन की राहे'
माझ्या टेबलासमोरील कुणी अनामिका
मी पहातोय तिचा चेहरा : बेफिकीर.
ती घेतेय का घुटके बीअरचे
की साठवतेय विष आत आत ?
तिच्या ओठांवर जळतेय सिग्रेट;
नि ती झटकीत सिग्रेटची राख सहजपणे.
आत्ताआत्ताच
ती निघून गेलीय
तिच्या बेदरकार चालीत.
तिच्या ओठांवर जळणारी सिग्रेटची आंच;
मला स्पर्शून गेलीय.

# तख्त

कोठडीत हिरसताना
त्याच्या अस्तित्वाला चढतोय गंज.
रात्रीचे जेलर
ऐकवतायत त्याला मृत्युघंटेचा नाद.
त्यांनी जप्त केलाय त्याचा वादळी समुद्र,
दृष्टीआड केलंय लखलखतं आभाळ;
नि राखून ठेवलीय लुतभरी मौत.
त्यांनी म्हणे
फाशीचं तख्त उभारलंय.

# ६ डिसेंबर १९७९

तुझ्या स्मरणातून
मी शोधतोय तुझी ज्वालामुखी आंच.
तर
तू चालत गेलास इतिहासाच्या पावलांनी
तू वावरलास त्यांच्या किर्र् स्मशानातून निर्भयपणे
तू साहिलीस धग : सरणांची
तू उखडल्यास : पराभूत कब्री
तू ठेचलेस : काळसर्प
जे आज
त्यांच्या जीर्ण थडग्यांतून सरपटतायत्.
तुझ्या प्रज्वलित दिव्यांवर फुत्कारतायत्.

# शहरातला समुद्र

मी पाह्यलेला शहरातला समुद्र :
उसळता
फेसाळता
गरजता
म्हटलं, करीन ह्याच्याशी दोस्ती
करीन ह्याला आत्मसात.
समुद्र दुरावत गेला;
आदळत राह्यला मलबारहिलच्या खडकांवर.
मी जवळिक केली सांडपाण्याशी.
माझ्या अस्तित्वमाझ्या
घोंगावल्या गटारघाणीवरून....
शहराच्या मेनहोलात मी कुजलो;
बेवारशी प्रेतासारखा.
शहाराच्या पृष्ठभागावर
मी स्थिरस्थावर
नुस्ता शेवाळलोय.

# कुणी नेलाय माझा सूर्यपक्षी छिनावून ?

प्रेतकळा आलेल्या घरातून
मी बाहेर पडतो
सुतकी चेहऱ्यानं.
खदखदलाच आतल्याआत ज्वालामुखी
तर दडपतो. संतप्त कवीच्या अव्यक्त कवितेसारखा.
ऑफिस : केबिन : बॉस : सर्कशीतला रिंगमास्टर : त्याचा धाक :
मी रूळतो खुर्चीत; माणसाळल्या सिंहासारखा.
परततो लोकलच्या मरणप्राय गर्दीतून;
नि आखतो कुंपणी सीमारेषा सभोवती.
बर्लिन म्हणतो, 'Liberty is self-real:sation.'
साला,
मी स्वत:ला ओळखू तरी कसा ?
कुणी नेलाय माझा सूर्यपक्षी छिनावून ?

## दोस्त

दोस्त,
तुझी ओळख पटली; तुझ्या अश्रूभिजल्या पत्रांतून....
ज्यांना होता तुझ्या उष्ण रक्ताचा स्पर्श;
नि त्यातून प्रकटलेलं तुझं निखळ मनस्वीपण;
नि तुझी संवेदनांची पाळेमुळे पसरलेली जगड्व्याळ.
तू घुटमळलास प्रियजनांजवळ क्षणभर;
नि झालास स्वार साहसी घोड्यांवर.
जे उधळले बेलगाम. चौखूर.... यज्ञकुंडाच्या दिशेनं.
म्हणून का ते आंधळे होते ?
दोस्त,
तुझे ज्वलंत स्मरण होत राहील,
बर्फाळ मरणप्रदेशातून.
अरे,
अंधारकोठड्यांच्या वज्रलेपी भिंती कोसळल्या नाहीयत
तुझ्याही पश्चात.
म्हणून का
तुझ्या हृदयातली आंच
नि बंदुकीतली आग
नि मरणातली सच्चाई
निरर्थक होती ?

## चक्रीवादळाच्या झंझावाती हातांचे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. २३८८५
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

चक्रीवादळाच्या झंझावाती हातांचे
मी स्वागत करतो.
असोत ते सर्वसंहारक;
त्यांची संहारशक्ती जी असते निसर्गाइतकी नैसर्गिक.
चक्रीवादळाचे हात : जे असतात न्यायदेवतेसारखे आंधळे.
जे दाखवित नाहीत मला वधस्तंभ नित्य.
वादळवाऱ्यातील समुद्रलाटांचे
मी स्वागत करतो.
नि ऐकतो गरजत्या समुद्रलाटांतून
मृत्यूची गाज;
जी देत नाही मला थेंब थेंब विष : दिसामाजी....

# अस्तित्वाच्या चौथऱ्यावर

कॅम्पस
समोर मनोरा
बाग
बहरलेल्या मित्रमैत्रिणी
हृदयात हिरवळ साठवून
ते आले होते ओयासिसाच्या प्रदेशातून.
त्यांच्या स्वरात मीही उच्चारलेले
जॉन स्टुअर्ट मिलचे वचन :
'An individual should grow according to his inclination.'
त्यांच्यासोबत
माझ्याही खुराड्यात जन्मलेली शुभ्र कबुतरे.
पंखात परंपरागत बळ साठवून
ते भरारतायत मनोकलानं.
मी दाणे टिपतोय
आभाळ दुर्लक्षून
अस्तित्वाच्या चौथऱ्यावर.


## कित्येक अंधारगुहा ओलांडून

मनामनातल्या अंध:कारावर बोट ठेवून
तू म्हणतोस
'You are like living corps in the morgue'
कृष्णमूर्ती !
तू सांगतोय्स
ते समूहमरण
आम्ही स्वीकारलंय.
कृष्णमूर्ती !
आम्ही पहातोय
धावत्या लोकलमधून
समुद्रक्षितिजावरील सूर्य : चलत्‌चित्रासारखा.
आमच्या दिशांचे पंख छाटलेय्‌त;
नि हे चतकोर आभाळ विस्तारत नाहीय.
तू निर्देशिलेला मुक्त प्रकाश पाह्यला
आम्ही येवूसुद्धा;
कित्येक अंधारगुहा ओलांडून.


# डोळे मिटलेलं आभाळ

ओरिजिनॅलिटी हरवलेल्या कलावंतासारखी
आभाळानं हरवलीय दृष्टी.
डोळे मिटलेलं आभाळ
पहात नाहीय
निळसर कांती
अकल्पित इंद्रधनुष्य
चुकार गरुडपक्षी
सूर्याचा प्रारंभ नि अस्त.
आभाळ बरसत नाहीय धुवाँधार पावसाळी:मोसमांत.
आभाळ जन्म देत नाहीय लखलखत्या विजेला.
आभाळ तोलत नाहीय विस्तार स्वत:चा.
आभाळ शवपेटीत कुणी ठेवलंय ?
आभाळावर पांढऱ्या ढगांचं कफन कुणी पांघरलंय ?

# निर्मितीचा प्रदेश



नव्यानं आल्यावर
अराजक वस्तीत
तू जा दुर्लक्षून
लगतचे पडिक स्मशान
प्रेतांची दुर्गंधी.
इथून जाताना
तू जपून ठेव तुझी हळवी फुले
मृत्यूची कसर लागण्याआधी.
तू स्वीकार
पुढील दलदल
निर्मितीचा प्रदेश म्हणून.


सतीश/८२

## हात अंधाराचे

हात अंधाराचे : सूर्यतेजानं सजग झालेत.
हात अंधाराचे : सूर्याला दंशणारे सर्प झालेत.
हात अंधाराचे : कलुषी : कलम करावेसे वाटलेत.

तेव्हा तू संवेदनांचे झरोके उघडे ठेव!

परंपरेच्या झोतानं
तुझा प्रतिक्षेचा गवाक्ष मिटल्यावर,
उपरोधिक रात्र तीक्ष्ण होत गेली आपल्यातून
तू अंधारलीस दुराव्यातल्या काळोखातून.
उद्या मी अवश्य येईल
माझ्या एकाकीपणाचे मर्तिक दफनून
नि शोधून आणीन पृथगात्म सूर्य;
तेव्हा तू संवेदनांचे झरोके उघडे ठेव!

## समुद्र पुन्हा बहरेल !

उधाणलेला समुद्र दूर गेलाय.
माझ्या दृष्टीक्षेपात विस्तारलाय
एकारला किनारा;
नि पायांखाली वाळू : कोरडी न् रिती.
येताना
माझ्या असहाय गलबताचे
पोझीटिव्ह सुकाणू घेवून ये.
बदलत्या भाववृत्तीतून
समुद्र पुन्हा बहरेल !

## कमळ

चिखल कमळाचं नातं अतूट असतं
जसं मातेनं वाढवावं बालकाला अंगाखांद्यावर.
कमळाचे पाय रूतलेले चिखलात दृढमूल;
नि कमळाचं मस्तक उन्नत.
चिखलातून कमळातून दरी पडते जेव्हा अपरिहार्य
तेव्हा कमळ होते एकाकी : अधांतरी.
कमळ सदृष्य विकसित होतंय.
कमळ अंतरी वेदनाव्याकूळ होतंय.

# गतिमान सूर्याच्या प्रखरतेतून

फास्ट लोकलसारखी
धावू नकोस अविश्रांत
ओलांडून विसाव्याची स्थानके.

गतिमान सूर्याच्या प्रखरतेतून
वाहून ने
तुझी आर्द्रतेची कावड.

अशी निपचित पडू नकोस
सांजवेळी
अंधारल्या शस्त्रागारात
काडतूस काढलेली बंदूक म्हणून.

# कलावंताच्या वेदनेसारखे

कलावंताच्या वेदनेसारखे
तुझ्या गर्भाशयात विस्तारलेले व्याकूळ ढग;
उजवतील तुझे गावकूस
रांगतील तुझ्या तळघरात
खेळतील
बागडतील
बरसतील
तुझ्या पूर्वकालीन वांझोट्या अंगणात;
लक्षणीय वादळवाऱ्यांबरोबर.

# तू पहा आकाशस्थ घनता

त्याच्या रखडू आयुष्यात
ती सेवारत होत गेली.
परिचारिकेनं द्यावा विश्वास
आसन्नमरण दुखणाईताला
तशी काढताना समजूत त्याची
ती म्हणायची,
'आज ना उद्या धरणीला पाय लागतील.
तेव्हा
द्रष्ट्या खिडकीतून
तू पहा दृष्यमान रस्ते.
चालत गेलेले क्षितिजापर्यंत;शक्यतांच्या पावलांनी.
किंवा
तू पहा आकाशस्थ घनता : ग्वाही देणारी भविष्यकालीन
उत्पातांची.'

## आभाळचेहरा

हाय वे अकस्मात उखडल्यानंतर
शहर अंकित करणं राहूनच गेलं.
विफल जखमांचे गाठोडे सांभाळीत
मी वणवण भटकलो;
शहराच्या चक्रव्यूहातून
नि
गल्ल्यांच्या चकव्यातून
नि
वर्तुळातल्या गुत्त्यांतून
नि
विद्यापिठीय आत्ममग्न कॅम्प्समधून
तेव्हा
वास्तविकाच्या दबावातून
बुटक्या होत गेलेल्या लोकांनी
माझा आभाळ चेहरा ओळखलाच नाही.

## तू पहा विस्तारलेला सुप्त धूर

तू असतेस सर्वांतून सर्वांमधून
म्हणून
तू नाहीस अदृष्य किंवा गूढधूसर.
मी पाहीन तूला
स्वच्छ रूपात
साध्यासुध्या वस्त्रात
अथवा
तुझ्या ज्वालाग्राही आवेशांत.
तू उतर
दारिद्रय रेषेखाली.
तू फिर
माझ्या मागासकीय प्रदेशातून.
तू प्रवेश
माझ्या दूरस्थ घरात.
तू पेटव
माझी मृतप्राय चूल.
तू घाल फुंकर.
तू फुलव इंगळ.
तू पहा
विस्तारलेला सुप्त धूर.

## तुझ्या काळ्याकभिन्न हातांनी

तुझ्या डोंगरमाथ्यावरून
नि अनुभूतीच्या गारव्यातून
मी विसरतोय माझा दैनंदिन शीण.
तू नसतोस नुसता रुक्ष नि खडकाळ
मी पहातोय तुझ्यातले भावनाशील झरे
नि वृक्षराजीतून व्यक्त झालेले तुझे डोळे.
तुझ्या उंचीवरून
नि माझ्या अजाण दृष्टीक्षेपातून
मी पहातोय अवघा परिसर
नि माझी दडलेली क्षितिजे.
मी मातीचा मऊपणा घेऊन येताना
तू हसतोस माझ्या भुसभुशीतपणाला.
तुझ्या काळ्याकभिन्न हातांनी
तू देतोस
तुझा अनुभवसिद्ध कणखरपणा.

# अनेक परिमाणे असलेल्या खिडक्या

प्रयोगक्षम आयुष्य फक्त चांचपडेल;
अंधत्व आल्याशिवाय
अख्खी प्रयोगशाळा अंधारल्यावर.
नंतर
प्रयोगशाळेतील सर्व दिवे ऑन होतील;
तेव्हा
लख्ख उजेडातून
नि
प्रायोगिकतेतून
अनेक परिमाणे असलेल्या खिडक्या सहज उघडतील.

# ती फिरतेय भूत वर्तमान भविष्याच्या गुहेंतून

ती हिंडतेय सर्वसमावेशक लोकलमधून
नि गातेय तिच्या जन्मदत्त लाचार स्वरांतून.
ती करतेय त्यांच्या शुभ्र शांततेचा भंग
ती होतच जातेय स्थितीजन्य,
कारण
ती डावलू शकत नाहीय,
एकवेळची प्रदीर्घ भूक.
ती फिरतेय भूत वर्तमान भविष्याच्या गुहेंतून.
तिच्या इवल्या गळ्यात
स्थिरावलाय
वृद्ध नि अवजड साईबाबा : आधार देणारा ? गळ्याला
तात लावणारा ?

## उघड मिटल्या सूर्यफुलात

व्यक्तीगत पातळीवर
कोमेजत जाण्याऐवजी
उद्या
सूर्याला
सहजी सामोरं जाणाऱ्या
उघडमिटल्या सूर्यफुलात
माझीही पाकळी असू दे.

# गर्दीच्या काळ्याशार समुद्रात

दिवसाउजेडी
गर्दी पसरतेय
सायंकालीन काळोखासारखी;
तेव्हा चुकार किरणे
होतायत् तिच्यात अदृष्य.
गर्दीच्या काळ्याशार समुद्रात
मी शोधतोय
माझा दिपस्तंभी चेहरा.
मी होतोय विसर्जित
गर्दीच्या क्षितिजावर
सूर्यास्तासारखा.
गर्दीच्या काळोखलाटांसमवेत
मी सरकतोय
संथपणे
निश्चित
सुरक्षित
किनाऱ्याकडे.

## मृत्यूचा सर्वंकष काळोख

चिंतनाच्या सर्व दिशा खुंटल्यावर
स्वप्नांचे घोडेही थांबतात अधोमुख होवून.
उन्हं उतरत जातात
नि
मृत्यूचा सर्वंकष काळोख
पसरतो हळूहळू स्लो पॉयझनसारखा अस्तित्वभर.

# मी आळवतोय ते शोकात्म सूर

मी आखतोय ते स्मशानक्षेत्र
मी रचतोय ते नकारात्म सरण
मी दहन करतोय ते एकाकी प्रेत
मी आळवतोय ते शोकात्म सूर
माझ्या कवितेला
मृत्यूच्या उंचीपर्यंत घेऊन जातील.

# सूर्य मळभला तरी

सूर्य भोवंडला
तेव्हा तुझ्या अनपेक्षित दु:खाचा
काळोख पसरला सर्वत्र.
ह्या तात्पुरत्या अंधारण्यातून
कदाचित तुझी सूर्यफुले उमलणार नाहीत.
तरीही
एक लक्षात असू दे !
सूर्य मळभला तरी
कधी कोसळत नाही.
अथवा
मृत्यूमुखी पडत नाही.

# अंधारगुहेला वळसा घालून

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२४७४
दा. क्र. २३८८५
काव्य २५६ ३
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0023885
REFBK-0023885

नियतीचा काळोख प्राशून
नि
अंधारगुहेला वळसा घालून
मी निश्चित स्थिरावेन
तुझ्या प्रज्वलित अस्तित्वाजवळ.
तेव्हा
तू पेटवशील ना
शक्यतांचे अनेकविध दिवे.